IJCRT.ORG ISSN : 2320-2882

INTERNATIONAL JOURNAL OF CREATIVE RESEARCH THOUGHTS (IJCRT)

An International Open Access, Peer-reviewed, Refereed Journal

# भारतीय पुरातत्त्व विभाग आणि महामहोपाध्याय डॉ. वा. वि. मिराशी : ऐतिहासिक अध्ययन

**मनीष पांडुरंग बावकर**

२१/०३, सहकार नगर, वडाळा, मुंबई – ४०००३१

**प्रास्ताविक**

अठराव्या शतकापर्यंत यूरोपिय नागरिकांना प्राचीन भारताविषयी फार थोडी माहिती होती. त्यांना ही माहिती पौर्वात्यभागाथ (आशियाखंडाचा पुर्वेकडील भाग) प्रवास केलेल्या व्यक्तींच्या प्रवास-वृत्तांतांतून मिळत असे. या प्रवासी व्यक्तींत प्रामुख्याने निकोलो कोन्टी, निकिटन, ल्यूगोविको-डी-वर्शेमा, ड्यूरेट बार्बोसा, ट्रॅव्हेर्निस यांचा समावेश होतो. मात्र विल्यम फिन्च याचा अपवाद वगळता प्राचीन भारतीय संस्कृतीचा मागोवा यांपैकी कोणीही घेतल्याचे त्यांच्या लिखाणांवरून दिसत नाही. इतकेच नव्हे तर, विजापूरविषयी लिहिणाऱ्या राल्फ फिन्च व ट्रॅव्हेनिअर यांना, दिल्ली आणि आसपासचा परिसर पिंजणाऱ्या टॉम कोरयॅट याला, त्यांनी केलेल्या या प्रवासात प्राचीन भारताच्या खाणाखूणा नजरेस पडलेल्या दिसत नाहीत.

पुढे मात्र थ्रॅवेटोनने पालथी घातलेली वेरूळची लेणीं, गार्सिया-दा-ओर्था व डॉ. गॅमेली कॅरेरी यांनी अभ्यासलेली कान्हेरी लेणीं, डॉ. फ्रॉयर व हॅमिल्टन यांनी केलेली घारापूरी लेणींची वर्णने युरोपात पोहोचली. ती वाचल्यावर मात्र त्यांच्याशी संबंधित प्राचीन संस्कृत साहित्याविषयी यूरोपातून विचारणा होऊ लागलेली दिसते. वास्तविक इ. स. १६५१ या वर्षीच्या अब्राहम रॉजर यांच्या 'ओपन डोअर टू फ्रिडम' या लिखाणाने संस्कृत साहित्यातील ब्राह्मणी सिद्धांताचा नमूना प्रकाशित झालेला होताच. वरील वृत्तांतपर लिखाण आणि संस्कृत साहित्याचे नमुने यांचा अठराव्या शतकातील यूरोपिय विद्वानांवर प्रभाव पडलेला दिसतो. याच काळात तेथे या विषयीच्या अभ्यासाची सुरुवात होऊन, त्यातून पौर्वात्य-पंडित ही संकल्पना जन्मास आली असावी, असे दिसते. मात्र 'प्राचीन भारत' हा विषय, स्वतः पुरातत्त्वविद नसणाऱ्या 'डॉ. सॅम्यूएल जॉन्सन' आणि कोलकात्यातील एक न्यायमूर्ती 'सर विल्यम जोन्स', या दोन विद्वानांनी जितका सखोलपणे अभ्यासला, तितका तत्पुर्वी कोणी अभ्यासला नसेल. याच सर विल्यम जोन्स यांनी ३० मार्च १७७४ या दिवशी, या विषयीची आपली मते गव्हर्नर जनरल वॉरेन हॅस्टींगला कळवली. परिणामी १५ जानेवारी १७८४ या दिवशी कोलकात्याला एशियाटीक सोसायटी स्थापन झाली. पुढे इ. स १७८८ या वर्षी 'एशियाटीक रिसर्चेस' या संशोधनपर नियतकालिकाची सुरुवात झाली. मात्र एकोणीसाव्या शतकाच्या मध्यापर्यंत ह्या क्षेत्रातील घडामोडी पूराणवस्तू आणि (प्रामुख्याने संस्कृत-प्राकृत) साहित्य यांच्या अवतीभवती घडत होत्या, असे दिसते.

कोलकात्याच्या टाकसाळीत 'एसे मास्टर' या पदावर कार्यरत असणाऱ्या जेम्स प्रिन्सेप यांनी भारतीय पुरातत्त्वशास्त्राला (आर्किओलॉजीला), पूराणवस्तू (पुरातत्त्ववाद) आणि संस्कृत-साहित्य, यांच्या पाशातून मोकळे केले. आपल्या वर उलेखलेल्या पदावर कार्यरत असताना प्रिन्सेप यांना एशियाटीक सोसायटीचे सचिव करण्यात आले. त्यामुळे प्रिन्सेप यांच्या वैज्ञानिक दृष्टीकोनाचा, शोधांच्या हव्यासाचा आणि कामातील काटकोर शिस्तीचा लाभ कोरीव लेखांचे वाचन, त्यांची नोंद, उत्खनन, प्राचीन इमारतींचे आराखडे इत्यादी गोष्टींत झाला. इ. स १८३४ ते १८३७ या काळात त्यांनी ब्राह्मी आणि खरोष्टी लिपींचा उलगडा केला तोवर केवळ पूराणवस्तू म्हणून ओळखली जाणारी, शिलालेख, ताम्रपटादी उत्किर्ण साधने आणि वैविध्यपुर्ण नाणी आता प्राचीन भारतीय इतिहासाची प्राथमिक साधने म्हणून प्रस्थापित झाली. दुर्दैवाने त्यानंतर थोड्याच कालावधीत (इ. स. १८४० या वर्षी) प्रिन्सेप यांचे निधन झाले.

इ. स. १८६१ या वर्षी पुरातत्त्व विभागाचे पहिले सर्वेक्षक (सर्वेयर) म्हणून अलेक्झांडर कॅनिंगहॅम यांची नेमणूक झाल्यावर भारतीय पूरातत्त्व विभाग खऱ्या अर्थाने एक संस्था म्हणून कार्यरत झाला. एकूणात भारतीय पूरातत्त्व विभागाची (आर्किओलॉजिकल सर्वे ऑफ इंडीया) अधिकृत स्थापना झाली.

महामहोपाध्याय डॉ. वासुदेव विष्णू मिराशी

महामहोपाध्याय डॉ. वा. वि. मिराशी यांचा जन्म कोकणातील सध्याच्या सिंधुदुर्ग जिल्हातील 'कुवेशी' या गावात झाला होता. मात्र कोल्हापूर क्षेत्रातून शैक्षणिक कालखंड व्यतीत केल्यावर, प्राध्यापकाच्या नोकरीनिमित्ताने त्यांचे इ. स. १९१८ या वर्षी नागपूरात आगमन झाले आणि पुढे ते नागपूरातच स्थायिक झाले. प्रभावी शैक्षणिक कारकीर्द असणाऱ्या महामहोपाध्याय मिराशी यांनी संस्कृत विषयातून एम. ए. केले होते. मुळात पूरातत्त्वशास्त्र वा प्राचीन भारतीय इतिहास हा त्यांच्या विद्याभ्यासाचा विषय नव्हता. संस्कृत विषयातील प्राविण्यामुळे सुरुवातीला त्यांचा संबंध प्राचीन भारतीय संस्कृती आणि पुढे पुरातत्त्वशास्त्रातील, पुराभिलेख व नाणकशास्त्राशी आला.

इ. स. १९१८ या वर्षी त्यांनी सदानंद यती यांच्या 'अद्वैत ब्रह्मसिद्धी' या ग्रंथाचे भाषांतर केले. इ. स. १९२८ या वर्षी त्यांनी मॉरीस महाविद्यालयाच्या स्नेहसम्मेलनांस अध्यक्ष म्हणून उपस्थित असताना तिथे डॉ. श्री. व्यं. केतकरांनी कालिदासाविषयी संशोधनबाह्य मते मांडली. अध्यक्ष म्हणून आपल्या तोवरच्या संस्कृत साहित्याच्या अभ्यासावरून मिराशी यांनी केतकरांचे तत्काळ खंडन केले. पुढे डॉ. केतकरांच्या तद्विषयावरील लिखाणाला प्रत्युचर देण्यासाठी, त्यांनी स्वतः संशोधन करून इ. स. १९३४ या वर्षी आपला 'कालिदास' हा संशोधित ग्रंथ प्रकाशित केला. मॉरीस महाविद्यालयातच 'प्राचीन भारतीय इतिहास आणि संस्कृती' हा विषय शिकविण्यासाठी त्यांनी प्राचीन कोरीव लेख, पुरातत्त्वशास्त्र, नाणकनास्त्र, शिल्प-स्थापत्यशास्त्र यावर तत्पूर्वीच्या विद्वानांनी केलेल्या लिखाणाचा कसून अभ्यास केला. संधी येताच तो अभ्यास आयताच त्याच्या उपयोगास आला.

**महामहोपाध्याय डॉ. मिराशी यांचा पुरातत्त्व विभागाशी झालेला परिचय**

डॉ. रायबहाद्दूर हीरालाल यांचे, इ. स. १९११ या वर्षी, नागपूरात पहिल्यांदा आगमन झाले. त्यानंतर सेवानिवृत्त झाल्यावरही ते संस्कृत आणि प्राकृतच्या कॅटलॉगकरीता पुन्हा नागपूरात येवून राहिले होते. त्यामुळे इ. स. १९११ या वर्षीपासून पुढे इ. स. १९३४ या वर्षी डॉ. हीरालाल मृत्यू होईपर्यंत, या भागात सापडणारे सारे कोरीव लेख, वाचनाकरीता त्यांच्याकडेच पाठवले जात. त्याकाळात महामहोपाध्याय मिराशी यांचा डॉ. हीरालाल यांच्याशी परिचय झाला. इ. स. १९२९ या वर्षी डॉ. हीरालाल यांच्या अध्यक्षतेखाली, महामहोपाध्याय मिराशींनी आपला 'प्राचीन भारतीय संस्कृती आणि इतिहास' या विषयातील पहिला संशोधनपर निबंध वाचला. यावेळी डॉ. हीरालाल यांनी मिराशींच्या संस्कृतविषयांतील पांडित्याचा दाखला मिराशींनाच देवून त्यांना सदर क्षेत्रात कार्य करण्याविषयी प्रोत्सहीत केले. रायबहादुरांच्या या कृत्याचा महामहोपाध्याय मिराशीं यांना अखेरपर्यंत विसर पडला नव्हता, असे मिराशी यांनी नोंदवून ठेवले आहे.

**भारतीय पुरातत्त्व विभागासोबत महामहोपाध्याय डॉ. वा. वि. मिराशी यांची वाटचाल**

इ. स. १९३१ या वर्षी पुरातत्त्व खात्याचे उपसंचालक रा. ब. दिक्षित नागपूरात आले होते. त्यांनी महामहोपाध्याय मिराशी यांच्याकडे या भागात आढळणाऱ्या कोरीव लेखांवर संशोधनपर लिखाण करावे, असा आग्रह धरला. इतकेच नव्हे तर डॉ. हीरानंद शास्त्र्यांकरवी वऱ्हाड प्रातांतील अमडापूर व बार्शी येथील कोरीव लेखांचे छाप महामहोपाध्याय मिराशी यांच्याकडे पाठवण्याची व्यवस्थाही केली. आपल्याकडे आलेल्या ही एक संधी आहे असे मानून, महामहोपाध्याय मिराशी यांनी कसून मेहनत घेत एक संशोधित लेख तयार केला. हा त्यांचा लेख 'एपिग्राफिया इंडीका' या नियतकालिकेच्या एकविसाव्या खंडात (XXI व्हाल्यूम) प्रसिद्ध झाला. त्यानंतर महामहोपाध्याय मिराशी यांनी 'इपिग्राफिया इंडीका'च्या सदतीसाव्या खंडापर्यंत (XXXVIIव्हाल्यूम) त्यात संशोधनपर लेखन केले. त्यात निरनिराळ्या राजघराण्याच्या कोरीव लेखांसंबंधित संशोधन होते. किंबहुना स्वतःला उत्किर्ण लेखांच्या संशोधनाकडे पहिल्यांदा वळविण्याचे श्रेयही महामहोपाध्याय मिराशी, रा. ब. दिक्षितांना देतात. उत्किर्ण लेखांच्या एकत्रिकरणाची जेम्स प्रिन्सेप यांनी सूचविलेली बृहद योजना अलेक्झांडर कॅनिंगहॅम यांनी कॉर्पस इन्स्क्रिप्शनम इंडिकॅरम (भारतीय उत्किर्ण लेखसंग्रह) या नावाने प्रत्यक्षात आणली. भारतीय पुरातत्त्व विभागाच्या 'भारतीय उत्किर्ण लेखसंग्रह' योजनेतील महामहोपाध्याय मिराशी यांचे कार्य अतिशय महत्वाचे आहे.

भारतीय उत्कीर्ण लेखसंग्रह आणि महामहोपाध्याय डॉ. वा. वि. मिराशी

इ. स. १९३० च्या आसपासच्या डॉ. रायबहादूर हीरालाल यांच्याकडे चेदी कोरीव लेखांच्या संशोधन-एकत्रीकरणाच्या संपादन कार्याचा प्रस्ताव भारतीय पुरातत्त्व विभागाने पाठवला होता. हे कार्य भारतीय उत्कीर्ण लेखसंग्रह (कॉर्पस इन्स्क्रिप्शनम इंडिकॅरम) या योजनेसाठी असावे असे दिसते. डॉ. रायबहादूर हीरालाल यांना उपरोक्त कार्यासाठी देण्यात येणारे मानधन आणि त्याच योजनेतल्या दुसऱ्या खंडातील खरोष्टी कोरीव लेखांच्या भागासाठी सपांदनासाठी डॉ. स्टाईन कोनो यांना देण्यात येणाऱ्या मानधन यात बरीच तफावत होती. त्यामुळे डॉ. रायबहादूर हीरालाल त्यांनाही डॉ. स्टाईन कोनो इतकेच मानधन द्यावे अन्यथा मी विनामूल्य काम करतो मात्र मला मदतनीस देऊन त्याला ५००० द्यावेत असे कळवले. यावेळी हीरालाल यांनी एम. ए. करीत असलेला एक तरुणाला आपला सहाय्यक म्हणून नेमल्याची माहिती, जयचंद्र विद्यालंकारजी यांनी दिल्याचे 'मध्यप्रदेश का इतिहास'च्या 'आभास' ह्या प्रास्ताविकात वाचता येते. हा तरुण महामहोपाध्याय वा. वि. मिराशीं असावेत का? असा प्रश्न पडतो. मात्र याच प्रास्ताविकात शेवटच्या ओळीत श्री. वा. वि. मिराशी, एम. ए. असे नावानिशी आभार मानल्याचेही दिसते. भारतीय पुरातत्त्व विभागाच्या 'भारतीय उत्कीर्ण लेखसंग्रह (कॉर्पस इन्स्क्रिप्शनम इंडिकॅरम)' या योजनेतील चौथ्या खंडाचे संपादन महामहोपाध्याय वा. वि. मिराशी यांनी केले होते. 'इन्स्क्रिप्शनस् ऑफ कलचूरी-चेदी इरा' असे नाव या खंडात चेदींच्या कोरीव लेखांचा समावेश असल्याने हा प्रश्न वाजवी ठरतो.

**भारतीय उत्कीर्ण लेखसंग्रह - खंड ४ था**

७ मार्च १९३५ या दिनांकाच्या पत्राद्वारे भारतीय पुरातत्त्व विभागाने महामहोपाध्याय यांच्याकडे, 'इन्स्क्रिप्शनस् ऑफ कलचूरी-चेदी इरा' या भारतीय उत्कीर्ण लेखसंग्रह (कॉर्पस इन्स्क्रिप्शनम इंडिकॅरम) या योजनेतील चौथ्या खंडाच्या संपादनाचा प्रस्ताव पाठवला. या खंडात कलचुरी आणि चेदी यांच्या कालखंडातील समग्र (तोवर उपलब्ध) कोरीव लेखांचा समावेश करावा असे ठरल्याने, यात अभीर आणि त्यांचे मांडलिक, त्रैकूट, पुर्वकालिन गुर्जर, शेंद्रक आणि गुजरातचे चालुक्य, हरिचंद्रिय, महिष्मती, त्रिपुरी आणि रतनपूरचे कलचुरी आणि मांडलिक यांच्या कोरीव लेखांचा यात समावेश आढळतो. नऊ वर्षाच्या परिश्रमानंतर, ६ मार्च १९४४ या दिवशी, तयार झालेल्या संपादनाची टंकीत प्रत महामहोपाध्याय मिराशी यांनी पुरातत्त्व विभागाच्या संचालकांकडे पाठवून दिली. मात्र दुसऱ्या महायुद्धाच्या धामधूमीमुळे त्याच्या मुद्रणाचे कार्य रेंगाळत राहिले. मात्र त्यामुळे या काळात कलचुरी काळावर नवा प्रकाश टाकणाऱ्या बाबी महामहोपाध्याय मिराशींना त्या खंडात जोडता आल्या. १९४९ या वर्षीच्या जून महिन्यात या खंडाच्या प्रत्यक्ष मुद्रणास सुरुवात झाली असली तरी, त्याची सांगता १९५४च्या डिसेंबरात झाली. इ. स. १९५५ या वर्षी चौथा खंड दोन भागात प्रकाशित झाला. दोन्ही भागांत मिळून १२३+५ अशा १२८ कोरीव लेखांचे संपादन आणि संकलन करण्यात आल्याचे आढळते.

**भारतीय उत्कीर्ण लेखसंग्रह - खंड ५ वा**

नागपूर-विदर्भ प्रांतावर इ. स. २२५ ते ५५९ पर्यंत राज्य करणाऱ्या 'वाकाटक राजघराण्या'च्या कोरीव लेखांच्या संपादनाचे कार्य महामहोपाध्याय मिराशी यांनी स्वयंप्रेरणेने हाती घेतले होते. भारतीय उत्कीर्ण लेखसंग्रहाच्या चौथ्या खंडाचे कार्य हातावेगळे केल्यावरच ते वाकाटक राजघराण्याकडे वळले असतील. मार्च १९५३ या काळात अमलानंद घोष हे भारतीय पुरातत्त्व विभागाच्या संचालकपदी आले. साधारण इ. स. १९५७-५८ या काळात ते नागपूरात आले असताना त्यांच्याकडे महामहोपाध्याय मिराशी यांच्या या कार्याची माहिती पोहोचली. त्यांनी झालेले हे संपादन कॉर्पस इन्स्क्रिप्शनम् इंडिकॅरमचा पाचवा खंड -'इन्स्क्रिप्शन ऑफ द वाकाटक' या रूपात प्रकाशित करण्याचा प्रस्ताव महामहोपाध्याय मिराशी यांच्यापुढे ठेवला. महामहोपाध्याय मिराशी यांनी झालेले संपादन विभागाच्या सुपूर्त केले. त्यानंतर ७ जुलै १९५८ला मुद्रणाचे आदेश कानपूरच्या जॉब प्रेसला देण्यात आले. मात्र मुद्रणाचे काम रेंगाळले आणि प्रत्यक्ष प्रकाशन इ. स. १९६३ या वर्ष झाले.

भारतीय उत्कीर्ण लेखसंग्रह - खंड 6 वा

९ ऑगस्ट १९७२, या दिवशी म. न. देशपांडे यांची पुरातत्तव विभागाच्या संचालकपदी नेमणूक झाली आणि ३० नोव्हे १९७८ या दिवशी त्यांनी आपले पद संचालकपद सोडले. ह्या कालावधीचा मुद्दाम उल्लेख अशासाठी की, नेमक्या इतक्याच काळाच महामहोपाध्याय वा. वि. मिराशी यांनी भारतीय उत्कीर्ण लेखसंग्रहाच्या सहाव्या खंडाच्या संपादनाचे काम तडीस नेले. वास्तविक इ. स. १७८८ मध्ये प्रकाशित झालेल्या पहिल्या एशियाटीक रिसर्चेस अंकातील पहिला लेख शिलाहार नृपती अरिकेसरी याचा इ. स. १०१७ मधील ठाण्याच्या ताम्रपटावरीलच होता. हा गव्हर्नर जनरल वॉरेन हेस्टींग याने कोलकात्याच्या पंडित रामलोचन याच्या मदतीने लिहिला होता. मिराशींपुर्वी शिलाहाराचा इतिहास लिहिण्याचा प्रयत्न डॉ. एम. जी. दीक्षित यांनी केला असल्याची आणि त्यांच्या निधनाने ते राहून गेल्याची नोंद खुद्द महामहोपाध्याय मिराशी यांनीच सदर खंडाच्या प्रस्तावनेत केली आहे. महामहोपाध्याय

मिराशी यांना ३१ मे १९७१ या दिवशी पुरातत्तव विभागाच्या संचालक कार्यालयाकडे शिलाहार राजघराण्याच्या समग्र कोरीव लेखांचे संपादन कराण्याच्या कार्याची मागणी करणारा प्रस्ताव पाठवला. त्याचवेळी त्यांनी शिलाहार राजघराण्याच्या काही अप्रकाशित कोरीव लेखांचे इस्टॅम्पेज पाठवण्याची विनंतीही विभागाकडे केली. पुढे कार्य तडीस गेल्यावर झालेल्या संपादनाची टंकलिखीत प्रत ३० जानेवारी १९७३ या दिवशी त्यांनी पुरातत्त्व विभागकडे पाठवली, ती २२ फेब्रुवारी १९७३ला प्रकाशनासाठी स्विकारण्यात आली. यथावकाश मुद्रण झाल्यावर महामहोपाध्याय मिराशी यांनी १ जून १९७७ या दिवशी त्यास प्रस्तावना जोडली. हा खंड इ. स. १९७७ या वर्षी प्रकाशित झाला.

## भारतीय पुरातत्त्व विभागाशी संबंधित महामहोपाध्याय डॉ. मिराशी यांच्या कार्याचे मूल्य

महामहोपाध्याय डॉ. वा. वि. मिराशी हे पुरातत्त्वाच्या क्षेत्रात इ. स. १९३५ ते १९८५ या उण्यापुऱ्या पन्नास वर्षाच्या काळात अखंडपणे कार्यरत होते. त्यांनी त्यातील १९३१-३२ ते १९६५-६६ या वर्षांच्या 'एपिग्राफिया इंडीका'च्या एकूण चौदा खंडांत (प्रकाशन काळ १९३१-७०) लेखन केले. त्यात सुमारे छप्पन संशोधित लेख लिहिले.

इ. स. १९३५ ते १९७७ या कालावधीत म्हणजे बेचाळीस वर्षे ते भारतीय उत्किर्ण लेखसंग्रह (CII) ह्या बृहद योजनेत कार्यरत होते. वास्तविक इ. स. १८७७ या वर्षी, भारतभर विखूरलेल्या समग्र उत्किर्ण लेखांचे त्यांच्या राजघराण्यानुसार संपादन करण्याची ही बृहद योजना प्रत्यक्षात सुरु झाली होती. या योजनेचे इ. स. १९३५ आणि १९५३ या वर्षी पुनर्परीक्षणही करण्यात आले होते. दोन्ही वेळा विद्वानांच्या नेमणूकाही करण्यात येवून निरनिराळ्या विद्वानांकडे निरनिराळी राजघराण्यांची संपादने देण्यातही आली होती. यात इंग्रज अधिकाऱ्यांनी सिद्ध केलेले पहिले दोन खंड आणि भांडारकरांनी संपादलेला तिसरा खंड, यानंतर पुढील महत्त्वाच्या तीन राजवंशांच्या उत्किर्ण लेखांच्या संपादनाची अवघड जबाबदारी महामहोपाध्याय वा. वि. मिराशी यांनी एकट्याने पार पाडलेली दिसते. इतकेच नव्हे तर, त्यानंतरही ह्या योजनेत केवळ पुढील एकच खंड प्रकाशित झाला. एकूणात, प्राचीन भारतीय इतिहासाच्या संकलनाच्या दृष्टीने महत्त्वाच्या असणाऱ्या भारतीय पुरातत्त्व विभागाच्या एका वैशिष्ट्यपुर्ण योजनेतील येथवरचा पुर्ण झालेला सर्वाधिक भाग हा महामहोपाध्याय मिराशी यांच्या कार्याचे फलीत आहे.

## निष्कर्ष

उत्किर्ण लेख, नाणी व प्राचीन वास्तू ही प्राचीन इतिहास समजून घेण्याची प्राथमिक दर्जाची साधने आहेत. कारण त्यांच्या व्यतिरिक्त आज प्राचीन काळाला जोडणारे इतर काहीच उपलब्ध नाही. त्यामुळे उपलब्ध होणाऱ्या या साधनांचे शास्त्रोक्त परिक्षण, संकलन आणि संपादन करणे अत्यंत आवश्यक असते. उत्खननातून पूरातन अवशेष उघड्यावर आणणे आणि उजेडात आलेल्या त्यां अवशेषांच्या परिक्षणाद्वारे त्याची प्राथमिक माहिती नोंदवणे हे पुरातत्त्वशास्त्राचे महत्त्वाचे कार्य. ते कार्य पुरातत्त्वविद (आर्किओलॉजिस्ट) करतात. महामहोपाध्याय वा. वि. मिराशी हे रुढार्थाने पुरातत्त्वविद नव्हते. ते संस्कृत-प्राकृत भाषेचे महामहोपाध्याय होते आणि त्याद्वारेच त्यांनी पुराभिलेख-नाणकशास्त्र यांत तज्ञता प्राप्त केली होती. पुरातत्त्वविदांना मिळणाऱ्या माहितीची संगती लावणे, मिळालेल्या संगतीतून एक सलग संहिता तयार करणे हे त्यामागील इतिहासाचा अन्वय लावण्याकरीता आवश्यक असते. महामहोपाध्याय वा. वि. मिराशी यांचा भारतीय उत्कीर्ण लेखसंग्रह (कॉर्पस इन्सक्रिप्शनम इंडिकॅरम) या योजनेतील सहभाग आणि त्यांनी त्यात पार पाडलेले कार्य तसेच त्यांनी लिहिलेल्या 'एपिग्राफीका इंडिका'तील लेखांतून याचीच प्रचीती येते. महामहोपाध्याय मिराशी यांच्या भारतीय पुरातत्त्व विभागाशी असलेल्या या ऋणानुबंधातून 'प्राचीन भारतीय इतिहास आणि संस्कृती' या विषयाला हा महत्त्वाचा लाभ झालेला आहे.

## संदर्भग्रंथयादी


1. Deshpande, G. T, Dr. Mirashi Felicitation Volume, Vidarbh Samshodhan Mandal - Nagpur, 1, 1965.
2. Foster William, Early travels of India 1583-1619, Oxford University Press, 1st, 1921.
3. Mirashi Vasudev Vishnu, INSCRIPTIONS OF THE VAKATAKAS, CII, The Director General - Archaeological Survey of India-Delhi, 1st, 1963.
4. Mirashi Vasudev Vishnu, INSCRIPTIONS OF THE SILAHARAS, CII, The Director General - Archaeological Survey of India-Delhi, 1st, 1978.
5. Mirashi Vasudev Vishnu, INSCRIPTIONS OF THE KALACHURI-CHEDI ERA, CII, The Director General - Archaeological Survey of India-Delhi, 1st (Rpt), 1998.

6. Ray Purnima, Patil C. B. (Ed.Mani B. R.), REMEMBERING STALWARTS, The Director General - Archaeological Survey of India-Delhi, 1st (Rpt), 2014.
7. Roy, Sourindranath, THE STORY OF INDIAN ARCHAEOLOGY 1784-1947, Archaeological Survey of India-Delhi, 1st (Rpt.), 2011.
8. मिराशी, वा. वि, कालिदास, सुविचार प्रकाशन मंडळ-नागपूर, १ली, १९३४
9. मिराशी, डॉ. वा. वि, शिलाहार राजवंशाचा इतिहास आणि कोरीव लेख, विदर्भ संशोधन मंडळ, नागपूर, १, १९७८.
10. लांडगे, दे. गो, मध्यप्रदेशातील संशोधनकार्य (सन १९३४ ते १९५४), मध्यप्रदेश संशोधन मंडळ, १ली, १९५६.
11. हीरालाल डॉ. रायबहादुर, मध्यप्रदेश का इतिहास, काशी नागरी प्रचारणी सभा, १, १९९६.


**नियतकालिके (मराठी)**


साधले नलिनी, पंचधारा, कै. डॉ. वा. वि. मिराशी विशेषांक, वर्ष २८वे, अंक तिसरा-चौथा, महाराष्ट्र साहित्य परिषद, आंध्रप्रदेश, १९८५.


**संकेतस्थळ**


भारतीय पूरातत्त्व विभागाचे संकेतस्थळ (Website, Archaeological Survey of India), दिनांक- १५ डिसें २०२४.